एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अनुसूचित भागातील (आदिवासी प्रकल्पातील) अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबाावि-२०१६/प्र.क्र.२३०/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०१६

**वाचा :-** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१२/प्र.क्र.४२९/का.०६, दिनांक १३ ऑगस्ट २०१४

**प्रस्तावना :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत अंगणवाडयांमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाने विहीत कार्यपध्दती दिनांक १३ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेली आहे.

Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act १९९६ नुसार अनुसूचित भागातील (आदिवासी प्रकल्पातील) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी (थेट / जाहिरातीद्वारे) शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” नुसार शैक्षणिक अर्हता, तसेच विधवा, अनाथ, मागास प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / विशेष मागास प्रवर्ग)/इतर मागासवर्गीय/कामाचा अनुभव इ. अशा प्रकारे एकूण १०० गुण त्याआधारे अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस या पदांसाठी उमेदवाराची निवडसूची तयार करावी व सदर निवडसूचीतून ग्रामसभा ज्या उमेदवाराच्या नियुक्तीस मान्यता देईल अशा उमेदवाराची अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस पदावर नियुक्ती करावी. अशा प्रकरणी गुणवत्ता यादीतील गुणानुक्रम कोणताही असला तरी त्याचा विचार करण्यात येऊ नये. परंतु उमेदवारास १०० पैकी किमान ६० गुण असणे आवश्यक राहील अशी तरतूद करण्यात आली होती.

अनुसूचित भागातील (आदिवासी प्रकल्पातील) अंगणवाडी सेविका /मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या वेळी वय, शैक्षणिक अर्हता, स्थानिक रहिवाशी, इत्यादी अटी तसेच विधवा, अनाथ, मागास प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / विशेष मागास प्रवर्ग)/ इतर मागासवर्गीय / कामाचा अनुभव अशाप्रकारे सर्व गुणांचा फायदा देऊनही आदिवासी क्षेत्रात किमान ६० गुण प्राप्त होणाऱ्या अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस मिळत नसल्यामुळे आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयांमध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या सेविकांना अधिकचे ५ गुण (ग्रेस मार्क) म्हणून वाढीव देण्याबाबत व असे वाढीव गुण देऊनही उमेदवार ६० गुणांची मर्यादा प्राप्त करीत नसतील अशावेळी सर्वात जास्त गुण मिळत असलेल्या उमेदवारांची अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस म्हणून ग्रामसभेच्या मान्यतेने नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अनुसूचित भागातील (आदिवासी प्रकल्पातील) अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या वेळी वय, शैक्षणिक अर्हता, स्थानिक रहिवाशी, इत्यादी अटी तसेच विधवा,

अनाथ, मागास प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / विशेष मागास प्रवर्ग)/ इतर मागासवर्गीय/कामाचा अनुभव अशाप्रकारे प्राप्त होणाऱ्या सर्व गुणांचा फायदा देऊनही आदिवासी क्षेत्रात किमान ६० गुण प्राप्त होणाऱ्या अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस मिळत नसल्यामुळे आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयांमध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या सेविकांना अधिकचे ५ गुण (ग्रेस मार्क) म्हणून वाढीव देण्याबाबत व असे वाढीव गुण देऊनही उमेदवार ६० गुणांची मर्यादा प्राप्त करीत नसतील अशावेळी सर्वात जास्त गुण मिळत असलेल्या उमेदवारांची अंगणवाडी सेविका/ मिनी अंगणवाडी सेविका /मदतनीस म्हणून ग्रामसभेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

हा शासन निर्णय अनुसूचित भागातील (आदिवासी प्रकल्पातील) अंगणवाडयांमध्ये (थेट / जाहिरातीद्वारे) नियुक्त करण्यात येणाऱ्या अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना लागु रहातील. तसेच उर्वरित सर्व अटी / शर्ती दिनांक १३ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे लागू असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९२२१२२८२१७७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing
Ramchandra
Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2016.09.22 12:29:50 +05'30'

(ला.रा.गुजर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य
६. सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (महिला व बाल कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
१८. सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास
१९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
२०. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी)

२१. सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका,

२२. सर्व मंत्रालयीन विभाग

२२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर

२३. महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद

२४. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद

२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई

२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२८. महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने

२९. निवड नस्ती (कार्यासन ६).